**Tarun Bharat (Thursday, 2nd August 2018) Pg No. 11**

# कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतला शेतकऱ्यांकडून कार्यानुभव



**मळकर्णे : केपे येथे कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी व शिक्षक.**

वार्ताहर
नेत्रावळी

कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राचा खास करून ग्रामीण भागातील कार्यानुभव घेता यावा म्हणून डॉन बॉस्को सुळकर्णे महाविद्यालयाचे विविध विद्यार्थी गटा गटाने ग्रामीण भागात पुढील पाच महिने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये मिसळून शेती ज्ञानाचे आदान प्रदान करणार आहे. त्यापैकीच एक गट मळकर्णे केपे येथे कार्यानुभव घेत आहे.

कुशावती पीस्टन या कृषी गटाच्या मुलांनी मळकर्णे येथील सरकारी हायस्कूलात कार्यक्रम आयोजित केला होता. यात डॉ. राजेश क्वळे, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. राजन शेळ्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कृषी दिनानिमित्त मुलांनी गावात झाडे वाचवा हा संदेश देत प्रभात फेरी काढली. मुख्याध्यापिका सिंधु प्रभूदेसाई यांनी आभार मानले.

अन्य एका कार्यक्रमात याच कृषी विद्यार्थ्यांनी गावात पिक लागवडीच्या पद्धती, खतांचे व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, माती परीक्षण, नवीन बियाणे, कीड व रोग नियंत्रण, गांडुळ खत निर्मिती, अळंबी उत्पादन, मधमाशी पालन यावर शेतकऱ्यांकडून माहिती व अनुभव घेत आहेत. तसेच सामाजिक उपक्रम जसे रक्तदान शिबिर, वृक्ष लागवड असे कार्यक्रम आयोजित करीत आहे. मळकर्णे येथे अक्षय परब, भूषण फळदेसाई, दिनेश रेखडो, सरजीयो फर्नांडिस, रवी शिंगाडी, अभिषेक कांबळी व इतर सहभागी झाले होते. मळकर्णे परिसरातील शेतकऱ्यांनी या विद्यार्थ्यांकडून शेतीविषयी माहिती व इतर लाभ घेण्याचे आवाहन फादर ऑलविन डिसोझा यांनी केले आहे.